# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२  sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ५४७/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा  दिनांक ११/१२/२०१८

## विशेष वार्तापत्र

## " मानवी हक्क दिवस साजरा "

भंडारा:- दिनाक १०/१२/२०१८ रोजी मानवी हक्क दिवस या निमीत्ताने भंडारा जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन येथे मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांचे मार्गदर्शनात "मानवी हक्क दिवस" पोलीस स्टेशन स्तरावर सर्व ठाणेदार यांनी आपले पोस्टे हददीत कार्यक्रम घेतले. त्यामध्ये पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत श्री. सुदामा ज्युनीअर कॉलेज मोहाडी येथे शाळेच्या आवारात मानवी हक्क दिनानिमीत्त शाळेतील शिक्षक वर्ग मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संविधानाने मानवाला कोणते अधिकार दिलेले आहेत. याविषयावर मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत जिल्हा परीषद हायस्कूल साकोली येथे कायदे विषयक शिबीर आयोजीत करण्यात आले. तेथे श्री. वाळके मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी न्यायालय साकोली यांनी विद्यार्थ्यांना मानवाधिकार व संविधान या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत मानवी हक्क दिवस या निमीत्ताने ग्राम पेंढरी येथे फिरते पोलीस स्टेशनचे कार्यक्रम घेण्यात आले. उपस्थितांना मानवाधिकार याविषयावर मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन आंधळगाव अंतर्गत मानवी हक्क दिवस या निमीत्ताने ग्राम मौजा नवेगाव येथे मानवी हक्क संरक्षण कायदा १९९२ मधील कलम १२ अन्वये मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता